(२५७) 2015042312051742224 ~~04165627~~

बिलाडी ल.पा. योजना ता.जि.नंदुरबार या योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- लपायो २००८/८११/प्र.क्र.२८३/२००८/खारभूमी
मत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- १६/१२/२००८.

पहावे :- १) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे पत्र क्रमांक मुअ/तापाविम/प्रशा-७/१५१७/ सन २००८,दिनांक १३.६.२००८

प्रस्तावना :-

ल.पा. योजना, बिलाडी ता.जि.नंदुरबार ही योजना आदिवासी क्षेत्रातील आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक ७.८.२००७ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत सदर योजनेचा प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. २५.९.२. अन्वये मान्यता देण्यात आली.

तापी खो-यातील गोमाई प्रकल्प रद्द झाल्यामुळे गोमाई प्रकल्पाचे पाणी उपलब्ध होत असून पाणी उपलब्धतेस महाराष्ट्र जलसंपत्ती नियोजन प्रांधिकरणाने दिनांक १५.१०.२००८ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांनी सदर योजनेचा सन २००७-०८ च्या दरसूचीयर आधारित दि.२०.८.२००८ नुसार अनुषांगिक खर्च १०% गृहित धरुन रु.२५२१.३३ लक्ष किंमतीचा प्रशासकीय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला व तो शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

आता या शासन निर्णयान्वये बिलाडी ल.पा. योजना, ता.जि.नंदुरबार या योजनेस सन २००७-२००८ या वर्षाच्या दरसुचीवर आधारित सुधारित केलेल्या प्राक्कलनानुसार कामाच्या एकूण अंदाजित रूपये २५,२१,३३,३९७/- (रूपये पंचवीस कोटी, एकवीस लक्ष, तेहतीस हजार तीनशे सत्याण्णव फक्त) यापैकी कामाप्रित्यर्थ रूपये २३,६८,३३,५३२/- व रूपये १,५२,९९,८६५/-

अनुषंगिक खर्च या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपशीर्षवार तरतूदीचा गोषवारा सोबत परिशिष्टामध्ये देण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी मुख्य लेखाशिर्ष "४७०२ लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ८००-इतर खर्च, १ बांधकामे ल.पा. योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना यावर खर्ची टाकावा व त्यावरील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १०९९/(१२९/९९) मोप्र (प्र) दिनांक १८/५/१९९९ मधील तरतूदीनुसार आतंर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता (५०/२००८) अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(र.श्री.कुलकर्णी)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा) मुंबई / नागपूर
वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग (१४६१), मंत्रालय, मुंबई
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
मुख्य [illegible]भियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
आतंर वि[illegible] सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (लपा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
अधीक्षक अभियंता,नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे
अवर सचिव (खारभूमी), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, नंदुरबार
उप सचिव (खारभूमी) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
अर्थ शाखा १ /२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
लपा-१ (२ प्रती) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
जिल्हाधिकारी, नंदुरबार
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालक, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
[illegible]
खारभूमी कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक लपायो २००८/(२८३/२००८) खारभूमी दि.१६/१२/२००८ चे परिशिष्ट

बिलाडी लघु पाटबंधारे योजना, ता. जि.नंदूरबार अंदाजपत्रकाचा गोषवारा

क्रमांक	शिर्ष / उपशिर्ष	रक्कम (रूपये लक्ष)		एकूण रुपयात
		शिर्षकामे	मुख्य व शाखा कालवे	
१	"ए" प्राथमिक	१५००००	१०००००	२५००००
२	"बी" (भूसंपादने)	८११३०३७६	२७०४५०६	८३८३४८८२
३	"सी" मुख्य कामे	११५०४७९७९	---	११५०४७९७९
४	"डी" विमोचक	१२२७११५२	५७९२३०	१२८५०३८२
५	"ई" फॉल	--	७३४४०९	७३४४०९
६	एफ आरएचटी वर्क्स	---	३९०९०९.	३९०९०९
७	जी पूल (सीटी क्रॉसिंग)	---	९३१३७६	९३१३७६
८	"एच" एस्किेप		१०००००	१०००००
९	"के" इमारती	१७९७०९	१५००००	३२९७०९
१०	"एल" मातिकाम	---	७७८४५१०	७७८४५१०
११	एम वृक्षरोपन	---	---	---
१२	ओ संकीर्ण	३५००००	१०००००	४५००००
१३	पी देखभाल	२०००००	१०००००	३०००००
१४	आर दळणवळण	४०००००	५००००	४५००००
	वितरिका	---	१३३७९३७६	१३३७९३७६
	कामाप्रित्यर्थ किंमत अनुषांगिक खर्च (२५.२५ टक्के भूसंपादन वगळून)	२०९७२९२१६	२७१०४३१६	२३६८३३५३२ १५२९९८६५
	योजनेची एकूण किंमत	--	--	२५२१३३३९७

ठळक वैशिष्टये

योजनेची सिंचन क्षमता	८३० हेक्टर
नियोजित पाणीसाठा	६९५८ सघमी
पाणीसाठयाची प्र.स.घ.मी. किंमत (रु.)	३६२३६ < ३६२७९ (आर्थिक मापदंड बसते)
लाभव्यय गुणोत्तर	१.४६ > १.०० (आर्थिक मापवंडात बसते)